**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७२०/२०१३**

**निशाणी क्र.८७ वरील आदेश**

वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी विरूध्द जाहीर ठराव, मनाई व वाटपाचाहुकुम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदरहु दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ३ विजय पांडुरंग भांड हा दिनांक ०९.०२.२०२३ रोजी मयत झाला असुन त्यांना सदरहु अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे वारस आहेत. येणेप्रमाणे अर्जात नमुद केलेले वारस रेकॉर्डवर घेण्याची परवानगी मिळावी.

**२.** प्रतिवादीच्या वारसांनी प्रस्तुत अर्जामध्ये म्हणणे दाखल करत अर्जातील मयतांचे वारस घेण्यास उशिर झाला आहे. परंतु, वारसांबाबत त्यांची काहीही आक्षेप नाही, असे नमूद केलेले आहे.

**३.** अर्ज व दाव्याचे अवलोकन केले असता, असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी विरूध्द दावा मिळकतीचे वाटप जाहीर ठराव व मनाई हुकुम मिळणेकरिता दाखल केलेला आहे. तसेच वादीचे अर्जाचे स्वरूप पाहता प्रतिवादी क्र. ३ च्या वारसांना सामील करण्यासाठी दिलेला आहे. सदयस्थितीत त्याचा कोणताही तोटा प्रतिवादींना संभवत नाही. दावा हा वाटप, जाहीर ठराव व मनाई हुकुमाचा आहे किंबहुना वादीचे वारस दाव्याकामी घेणे हे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक बाब आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे -

**आदेश**

१. सदरहु अर्ज निशाणी क्र.८७ वरील आदेशाची पुर्तता करण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जात उल्लेखीत केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. ३ विजय पांडुरंग भांड यांचे वारस दाव्यामध्ये दुरूस्ती करून सामील करावेत तसेच दुरूस्त दाव्याची प्रत या आदेशापासुन १४ दिवसांचे प्रतिवादी यांस पुरवावी.

स्वाक्षरीत/-
(पी. आर. पालवे)
४थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर
( न्यायालय क्र. ०४ ) संगमनेर.

दिनांक : ०३.११.२०२३
ठिकाण-संगमनेर.